

डॉ. नितीन परख

फेंगशुई पद्धतीमधील 'फ्लाइंग स्टार फेंगशुई' ही सर्वात प्रगत तंत्रशुद्ध उच्चतम अशी शिक्षणपद्धत किंवा विद्याशाखा समजली जाते. अर्थातच ही शिक्षणपद्धती अतिशय गुंतागुंतीची व बरीचशी किचकट असली तरीही ती तितकीच प्रभावी आणि परिणामकारकही आहे.

# फ्लाइंग स्टार फेंगशुई



मागील लेखामध्ये मी भाग्याच्या तीन वेगवेगळ्या प्रकाराबद्दल चर्चा केली. या सर्व तीन भाग्यामध्ये सर्वात महत्त्वाचे भाग्य 'स्थान भाग्य' आहे. कारण तांत्रिकदृष्ट्या आपली वास्तव्याची किंवा व्यवसायाची जागा बदलून आपण दुसऱ्या भाग्यवान जागेत जाऊ शकतो. थोडक्यात आपले 'स्थान भाग्य' बदलणे सर्वस्वी तुमच्या हातात आहे. तुम्ही तुमचे 'स्वर्गीय भाग्य' बदलू शकत नाही. कारण आपण आपली जन्मकुंडली बदलणे अशक्यच आहे.

आपले भाग्य उजळण्यासाठी जागेची, मग ती वास्तव्याची असो किंवा व्यवसायाची, अत्यंत अचूक मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता असते. त्याकरिता 'फ्लाइंग स्टार फेंगशुई' यापेक्षा अधिक प्रभावी कोणतीच पद्धती नाही. फेंगशुई पद्धतीमधील 'फ्लाइंग स्टार फेंगशुई' ही सर्वात प्रगत तंत्रशुद्ध उच्चतम अशी शिक्षणपद्धत किंवा विद्याशाखा समजली जाते. अर्थातच ही शिक्षणपद्धती अतिशय गुंतागुंतीची व बरीचशी किचकट असली तरीही ती तितकीच प्रभावी आणि परिणामकारकही आहे. त्यामुळेच ती एखाद्या वास्तूची वर्तणूक (म्हणजेच ती भाग्यकारक आहे की भाग्यनाशक आहे) अचूकपणे वर्तवू शकते. या शास्त्राचे खरेखुरे ज्ञान, त्यावरून केलेले स्थानाचे विश्लेषण आणि त्यावरून त्याचा उपयोग करणे या सर्व गोष्टी जगातील फार थोड्या फेंगशुईतज्ज्ञांना येतात. याबाबतीत मी स्वतःला अतिशय भाग्यवान समजतो कारण या विद्येतील अत्यंत श्रेष्ठ गुरूंकडून मला या चमत्कार घडविणाऱ्या ज्ञानाचे धडे मिळाले. 'मास्टर जोसेफ यू' हे या विद्येतील संपूर्ण जगातील ॲथोरिटी समजले जातात. त्यांच्याकडे मी अनेक वर्षे ही विद्या शिकत होतो. 'मास्टर याप चांग ही' या अशाच जगातील दुसऱ्या श्रेष्ठ गुरूकडून मी हे शास्त्र शिकू शकलो ही परमेश्वराची माझ्यावर मोठी कृपाच आहे अशी माझी भावना आहे. अनेक वर्षांपूर्वी मलेशियामधील मॅडम लिलियन यांच्या संस्थेमधून 'मास्टर प्रॅक्टिशनर कोर्स' मी पूर्ण केला आहे.

एखाद्या वास्तूचा 'फ्लाइंग स्टार चार्ट (नकाशा)' तयार करण्यापूर्वी त्या वास्तूच्या बांधकामाची पूर्तता नेमकी केव्हा झाली हे माहीत असणे आवश्यक आहे. तुमच्या घराची किंवा सदनिकेच्या मुख्य दरवाजांची दिशा कोणत्या बाजूला आहे हे लक्षात घेणे जरुरीचे आहे. समजा एखादे घर १९९० साली बांधून पूर्ण झाले असेल तर त्या घराचा काळ १९८४ ते २००४ दरम्यानचा समजला जातो. आणि जर या घराचा मुख्य दरवाजा उत्तर दिशेच्या ४ अंशाला असेल तर अशा घराला 'एन-२ फेसिंग हाऊस' म्हणतात :

'एखाद्या वास्तूचा 'फ्लाइंग स्टार चार्ट' तयार करण्यासाठी त्या वास्तूच्या मुख्य दरवाजाची दिशा अतिशय काळजीपूर्वक व

अचूकपणे शोधणे आवश्यक आहे. त्यासाठी इंजिनिअरिंग कंपास (होकायंत्र) किंवा ल्युओ पॅन वापरावे. बंगल्यासारख्या वास्तूसाठी त्याची सन्मुख दिशा (फेसिंग साइड) त्या बंगल्याच्या मुख्य दरवाजावरून ठरविता येते तर ब्लॉकसाठी किंवा अपार्टमेंटकरिता ती वास्तू कोणत्या दरवाजातून जास्तीत जास्त युवा ऊर्जा घरात घेते त्यावरून त्या ब्लॉक अथवा अपार्टमेंटचा मुख्य दरवाजा नक्की करून त्यावरून त्या वास्तूची फेसिंग डायरेक्शन 'सन्मुख दिशा' ठरवता येते. वास्तूची सन्मुख दिशा (फेसिंग डायरेक्शन) ठरविण्याकरिता अनेक वर्षांच्या अनुभवाची आणि प्रगत अशा कौशल्याची गरज आहे.


थोडक्यात काय तर फ्लाइंग स्टार फेंगशुई हे शास्त्र काही साधंसुधं किंवा सोपं नाही. जे कोणताही सामान्य माणूस नुसती त्यावरची पुस्तकं वाचून मिळवू शकेल. या विद्येत प्रावीण्य मिळविण्यासाठी उच्च दर्जाची बुद्धिमत्ता, चांगल्या शिक्षणाची पार्श्वभूमी असणे हे आवश्यक आहे. कोणत्याही ऐऱ्यागैऱ्या माणसांकडून ही विद्या मिळणार नाही.

वास्तूची सन्मुख दिशा नक्की केल्यावर वास्तूची बैठकीची दिशा (जिला पर्वत दिशा (माऊंटन साईड) ठरविता येते कारण ही दिशा सन्मुख दिशेच्या कर्णाच्या दिशेने परंतु विरुद्ध असते. जर वास्तूची दिशा एन-२ असेल तर बैठकी दिशा एस-२ असते.

प्रत्यक्ष एखाद्या वास्तूचा फ्लाइंग चार्ट तयार करण्यासाठी अतिशय गुंतागुंतीच्या गणिताच्या आकडेवारीची गरज असते.

आता आपण उदाहरण म्हणून या सर्व गुंतागुंतीच्या आकडेवारीनंतर तयार करण्यात आलेला फ्लाइंग स्टार चार्ट पाहूया. आपण पीरिअड (कालावधी) ७ मधील मुख्य दरवाजा एन-२कडे ४ अंशाचा कोन केलेल्या मुख्य दरवाजा असलेल्या वास्तूचा फ्लाइंग स्टार चार्ट पाहूया.

प्रत्येक चौकोनातील मोठ्या संख्या असलेल्याला टाइम स्टार म्हणतात. असे एकूण नऊ चौकोन चार्टमध्ये आहेत. या संख्येच्या उजव्या बाजूस असलेल्या लहान आकाराच्या आकड्याला वॉटर स्टार तर डाव्या बाजूच्या लहान आकाराच्या आकड्यास माऊंटन स्टार म्हणतात. चार्टमधील प्रत्येक लहान चौकोनामधील (ज्याला सेक्टर म्हणतात) लहान आकड्यांच्या बेरजेवरून घराचा तो सेक्टर भाड्याचा किंवा दुर्भाग्याचा हे वर्तविता येते; परंतु फेंगशुई फ्लाइंग स्टारच्या चार्टमधील प्रत्येक सेक्टरमधील आकडेमोड करून त्याचे विश्लेषण करणे ही सोपी गोष्ट नाही. आपल्या अनेक वर्षांत मिळविलेल्या ज्ञान व अनुभवाची खरी कसोटी ही आकडेमोड व विश्लेषण करताना लागते. कारण प्रत्येक सेक्टरमधील स्टारच्या युती व त्यांचे एकमेकांवर होणारे परिणाम यांचा येथे सखोल अभ्यास करावा लागतो. यासाठी अनेक वर्षांचे कौशल्य पणाला लावावे लागते. म्हणूनच वास्तुशास्त्राच्या 'तथाकथित' तज्ज्ञापासून सावध




राहा. अशा वास्तुशास्त्रज्ञाचे शिक्षण, त्याच्या ज्ञानाबद्दलची सत्यस्थिती, त्याचा या विद्येतील अनुभव तपासून घ्या. 'कोणत्या गुरूकडून त्याने ही विद्या संपादन केली?' त्यांची नावे त्याला विचारा. ज्याला अनुभव नाही फक्त या विद्येचे शिक्षण घेतले, अशा वास्तुशास्त्रज्ञांचा सल्ला घेऊ नका. प्रत्येक महिन्यात माझ्याकडे अशा तथाकथित वास्तुशास्त्रज्ञांकडून फसगत झालेली अनेक माणसे माझ्याकडे येतात, म्हणून 'सावधान'.

फ्लाइंग स्टार चार्ट तयार करण्याचा मुख्य उद्देश त्या वास्तूचा कोणता भाग भाग्योदय करू शकेल व कोणत्या भागापुढे भाग्यनाश होऊ शकेल हे जाणून घेणे हा आहे. घरातील कर्त्या पुरुष (अथवा स्त्री)साठी घरातील जागांमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे का, हे या चार्टवरून लक्षात येते. जर घरातील या भागात सुधारणा करणे शक्य नसेल तर घरातील त्या भागामुळे होणारे वाईट परिणाम कमी करण्यासाठी काही खास फ्लाइंग स्टार फेंगशुई कव्हं वापरावे लागतात.

'मेन्शन केव्हीए' या फेंगशुईच्या कंपास सूत्राने आकडेमोड करून या विद्येचा उपयोग केला तर फ्लाइंग स्टार फेंगशुई हे शास्त्र अतिशय प्रभावी शास्त्र आहे.

फेंगशुई म्हणजे आपल्या घरात काही फेंगशुई वस्तू किंवा कव्हं इतकडे तिकडे ठेवणे अशी काही व्यक्तींची समजूत झाली आहे त्यांना माझ्या या लेखामुळे हे लक्षात येईल. हे काही साधेसुधे शास्त्र नाही. घरात काही बेडकांच्या, कासवांच्या प्रतिकृती किंवा नाणी ठेवली म्हणजे भाग्योदय होत नाही. जर फ्लाइंग स्टारची बेरीज चुकीची झाली तर भाग्योदय होण्याऐवजी भाग्य नाशच होण्याची शक्यता आहे.

❖